महाराष्ट्र शासन

**कला संचालनालय**

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१, दूरध्वनी २२६२०२३१/२

क्रमांक:-डिओए-२०१९/दोन/ 1027 दिनांक: 21 JUN 2019

वाचावे:- या संचालनालयाचे पत्र क्र.डिओए-२०१९/दोन/ ०८९१, दिनांक २८.५.२०१९.

**शुध्दीपत्रक**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित कला संस्थांना कळविण्यात येते की,शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील दीर्घसुट्टया, सत्रसमाप्ती आणि सत्राचे ( पदविका ) नियोजन या संदर्भातील उक्त वाचावे मधील पत्र www.doa.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. सदर पत्रातील पान क्र.२ वरील मुख्य मुद्दा क्र.३. खालीलप्रमाणे वाचावा

"३. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील विद्यार्थी प्रवेशासंबंधीची माहिती/कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

१) प्रवेशासंबंधीचे नियम विचारात घेऊन प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली समितीने संस्थेतील मुलभूत, प्रथम वर्ष (अंतर्गत गृहसजावट, वस्त्रकाम, मातकाम, धातूकाम), कला शिक्षक प्रशिक्षण (नवीन अभ्यासक्रम), एलिमेंटरी-रेखाकला व रंगकला, एलिमेंटरी-उपयोजित कला, एलिमेंटरी-शिल्पकला, आर्ट मास्टर(अंशकालीन वर्ग), डिप.ए.एड. अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी अंतिम यादी तयार करावी. या समितीवर खालीलप्रमाणे सदस्य राहतील. समितीने सदस्यांची नांवे या कार्यालयात तसेच निरीक्षक,चित्रकला व शिल्प,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात दि. ७ जून, २०१९ पर्यंत कळवावीत.

अ) संस्थेचे प्राचार्य.

ब) प्रत्येक विशिष्ट अभ्यासक्रमाचे ज्येष्ठतम अध्यापक.

२) शालांत परीक्षेचा निकाल लागल्यापासून प्रवेशाचे काम संपेपर्यंत प्रवेश देण्याचे काम सर्व कला महाविद्यालयात सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळातच करावे. प्रवेश अर्ज स्विकारण्यासाठी ठरविण्यात आलेल्या कालावधीत संस्थेने सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारावेत. तसेच संस्थेकडे प्राप्त झालेल्या अर्जाची प्रथमत: आवक नोंदवहीमध्ये नोंद करुन प्रत्येक अर्जावर नोंदवहीतील क्रमांक व दिनांक दर्शविण्यात यावा.

३)नोंदविण्यात आलेल्या सर्व प्रवेश नियमानुसार वरील समितीने छाननी करुन अभ्यासक्रमनिहाय गुणवत्तायाद्या सर्व समिती सदस्यांच्या सहीनिशी तयार कराव्यात. गुणवत्ता यादीत १) अनुक्रमांक. २) नोंदणी क्रमांक. ३) विद्यार्थ्याचे पूर्ण नांव. ४) अर्हता परीक्षेत मिळालेली टक्केवारी आणि महाराष्ट्र शासनाच्याच इंटरमिजिएट ड्रॉईंग परीक्षेतील ग्रेडनुसार मिळालेले मुल्यांकन गुण. ५) एस.एस.सी. अथवा समकक्ष परीक्षेतील टक्केवारी व इंटरमिजिएट परीक्षेतील ग्रेडनुसार मिळालेले मुल्यांकन गुण या दोघांची बेरीज."

तसेच सदर पत्रातील पान क्र.२ वरील मुख्य मुद्दा क्र.४ मधील परिच्छेद क्र.१ खालीलप्रमाणे वाचावा.

"४. भारतीय संविधानानुसार व मंडळ आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार कला विषयक शिक्षण संस्थांत प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण ठेवण्यात यावे."

(राजीव मिश्रा)
प्र.कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई.

२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.

३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.

४)प्राचार्य, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्था.(महाराष्ट्र राज्य)

प्रत,माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१)निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२)परीक्षा नियंत्रक,कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

३)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,नागपूर.